प्रेसनोट दि.१४/०३/२०१९

## दत्तवाडी पोलीस ठाणे,पुणे शहर

## ज्येष्ठ नागरीकाच्या गळ्यातील सोन्याचीचैन हिसकावुन जबरीचोरीकरुन पळणारा चोरजेरबंद

दांडेकर पूल परिसरात राहणारे ज्येष्ठ नागरिक वय ७४ हे दिनांक १३ मार्च २०१९ रोजी सकाळी ९:३०वाजण्याच्या सुमारास विजय गॅरेजजवळ ,त्याच्या ओळखीच्या बाळू पवार यांच्या घराजवळ कट्ट्यावर बसले असताना त्यांच्या वस्ती मध्ये राहणारा असिफ शाबीर शेख वय २१ वर्ष राहणार सर्वेनंबर १३३ दांडेकर पूल,पुणे याने "तुम्ही बुवा का? तुमच्या गळ्यातील चेन सोन्याची आहे का? त्याला हो चेन सोन्याची आहे असे शंकर फडकले म्हणताच त्यांना काही समजण्याच्या आत असिफ शेख याने गळ्यातील चेन हिसकावून घेतली व जबरी चोरी करून पळून गेला म्हणून त्यांचा मुलगा विकास शंकर फडकले वय४५ यांनी असिफ शेख विरुद्ध तक्रार दिल्याने गुन्हा नोंद करण्यात आला असून असिफ शेख याला तातडीने अटक करण्यात आले असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदासघेवारे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उपनिरीक्षक मंगेश साळवे हे तपास करत आहेत.

(देविदास घेवारे)
**वरीष्ठ पोलीस निरीक्षक**
दत्तवाडी पोलिस स्टेशन,पुणे